DOMS Page No.
Date / /

# "मातृहृदय"

आटपाट नगरीत एका, माणसे राहत होती गुण्यागोविंदाने
समवेत त्यांच्या प्राणी, पशू, पक्षीही विहरत होती आनंदाने ----
हासत खेळत कष्ट करीती, गावकरी जणू एकच परिवार
राबतोच शेतात शेतकरी, फुलले हिरवेगार शिवार ----
काळी आई झाली प्रसन्न, भरले सगळे धान्याचे कोठार
निगुतीने सांभाळतांना होई तारांबळ, त्यात उंदरांचा हैदोस फार ----
रोज रोज धान्याची नासाडी, दामू शेतकरी हवालदील अंतरी
आठवले त्याला मनीने दिलीत दोन/तीन पिल्ले गुरुजींच्या घरी ----
त्वरीत येवूनी त्यांचे घरी, केली विनवणी, द्यावे मांजरीच्या पिल्लांशी
गुरुजी सहृदय अंतःकरणाचे, म्हणाले, जा घेवूनी, कां चिंता करीशी ??
निश्चिंत होवून, गोणपाटात टाकूनी, आणिली पिल्ले कोठीघरात
म्यॅव म्यॅव करुनी भिरभिरती ती, अन ओरडती केविलवाण्या स्वरात ----
दामू म्हणाला, थोडी मोठी झाल्यावर, नक्कीच फाडणार फडशा या उंदरांचा
मिळेल मेजवानी त्यांना, अन् आपुलाही प्रश्न सुटेल कायमचा ----
फेरफटका मारुन आलेल्या मनीला कुठे दिसेना पिल्ले गुरुजींकडे
फुत्कार सोडीत रागाने, शोधू लागली मनी वेड्यासारखी सगळीकडे ----
रात्र होताच दाटला अंधार, पसरली शांतता, झाली निजानीज
मनी मग धावे सैरावैरा, धडपडे माग काढण्यास, बिचारे आईचे काळीज ----
खूण पटूनी गवसली पिल्ले, एकाएकास तोंडात धरुनी आणले गुरुजींकडे
सकाळी बघतात तो काय, आनंदाने सर्व, बघूनी झेपावणारी पिल्ले आईकडे ----
शोधत शोधत दामू आला, म्हणाला मनीसगट पिल्ले मला द्या ना
करु नाही त्यांची ताटातूट, मायलेकरांचे वात्सल्य कसे ते पहा ना ----
घेवूनी गेला मनीसोबत सगळ्या पिल्लांना, राहू लागली मनी मजेत
हळूहळू उंदरांचीही संख्या झाली कमी, अन रमली पिल्लेही मनीच्या कुशीत !!

श्री विष्णु रामचंद्र उपाध्ये गुरुजी

प्रासंगिक कविता लेखन
सौ. विजया जोशी

